**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**

**सन २०२३-२४ करिता (लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) अंतर्गत नाशिक महानगरपालिका जि. नाशिक करिता रक्कम रू.९.६० कोटी**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२३/प्र.क्र.३२७(९)/नवि-१६**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक:- १७ ऑगस्ट, २०२३**

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दि. १२ डिसेंबर,२०१७, दि. ३० सप्टेंबर,२०२० व दि. २४ एप्रिल, २०२३

(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२ एप्रिल,२०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कामांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद"** या योजनेंतर्गत **नाशिक महानगरपालिका जि. नाशिक** करिता **सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांकरीता रक्कम रुपये ९,६०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ कोटी साठ लक्ष फक्त)** इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाअंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा **"सार्वजनिक बांधकाम विभाग"** राहील.

३. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे.सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम)

असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची

उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, नाशिक यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, नाशिक यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, नाशिक / जिल्हा प्रशासन अधिकारी, नाशिक यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१५. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करुन नये.

१६. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१, दि. २८ मार्च,२०२२ व दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

१९. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-५, मुख्य लेखाशिर्ष ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण,१९१, स्थानिक संस्था,महानगरपालिका, नगर विकास प्राधिकरणे, शहर सुधार मंडळे,

इत्यादींना सहाय्य, (००) (०२) महागनरपालिका क्षेत्रात मुलभूत सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद (कार्यक्रम), (४२१७ ०५४१), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

२१. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीकांत आंडगे)

**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापुर भवन, ७ वा मजला, नवी मुंबई- ४०० ६१४.
३. विभागीय आयुक्त, नाशिक
४. जिल्हाधिकारी, नाशिक
५. आयुक्त, नाशिक महानगरपालिका जि. नाशिक
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, नाशिक
१३. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय क्रमांक:- मनपा-२०२३/प्र.क्र.३२७(९)/ नवि-१६**

**दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ सोबतचे विवरणपत्र**

**नाशिक महानगरपालिका, जि. नाशिक क्षेत्रातील कामे**

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामाचे नाव | रक्कम रु.(लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | ३१ | मुरलीधर गामणे मळा येथे मनपाच्या सर्व्हे नं. ९१५ या जागेत स्केटिंग बँड ट्रॅक बांधणे. | २८०.०० |
| २ | २७ | स्वामी समर्थ उद्यान, भाद्रपद सेक्टर, श्रीक्षेत्र संत शक्ती धाम देवस्थान येथे उद्यान विकसित करणे, संरक्षक भींत बांधणे व रंगमंच बांधणे. | ५०.०० |
| ३ | १० | सातपूर येथील होलकर पोलीस चौकी ते डॉ. शेंडे हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ५०.०० |
| ४ | ४ | पंचवटी लामखेडे मळा येथील आई बंगल्यालगत स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान विकसित करणे. | ४०.०० |
| ५ | १३ | नाशिक मधील प्राचीन बडी दर्गा येथे सुशोभीकरण करणे. | ४०.०० |
| ६ | २२ | पिंपळगाव खांब येथे गावांतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे. | २०.०० |
| ७ | २२ | वडनेर दुमाला येथे दत्त मंदिरा समोर सभामंडप बांधणे. | २०.०० |
| ८ | २७ | दत्तनगर कारगील चौक येथे उद्यान विकसित करणे. | ४०.०० |
| ९ | १६ | उपनगर येथे म्हसोबा मंदिर समोर सभामंडप बांधणे व सुशोभीकरण करणे. | ४०.०० |
| १० | २९ | स्वामी विवेकानंद नगर मधील शिवनेरी चौक ते जुना स्टेट बँक चौक चौपाटीपर्यंत काँक्रीट रस्ता बनविणे. | ४०.०० |
| ११ | ०७ | गितांजली सोसायटी येथे मनपा ओपन स्पेसचे सुशोभीकरण करणे. | ४०.०० |
| १२ | १२ | पारिजात नगर येथील त्रिकोणी गार्डन सुशोभीकरण करणे. | ३०.०० |
| १३ | ६ | रामनगर मोरे मळा हनुमानवाडी येथील हनुमान मंदिरासमोर सभामंडप बांधणे. | २५.०० |
| १४ | २४ | गोविंद नगर येथे रामबंधु मसाले ऑफिस समोरील मनपा ओपन स्पेसमध्ये सभामंडप बांधणे. | २५.०० |
| १५ | ९ | गट नं. १९४, विठ्ठल रूक्मिणी मंदिराला संरक्षक भींत बांधणे. | २५.००० |
| १६ | १८ | जेलरोड पंचक येथील अमृत उद्यान सुशोभीकरण करणे. | २०.०० |
| १७ | १८ | जागृती नगर -२, जेलरोड येथे मनपाच्या जागेत सभामंडप बांधकाम करणे. | २०.०० |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामाचे नाव | रक्कम रु.(लक्ष) |
|---|---|---|---|
| १८ | ३ | पंचवटी येथील अमृतधाम, गणेश मंदिर, अंबाजी नगर येथे सभा मंडप बांधणे. | २०.०० |
| १९ | ३१ | सुखदेव विद्या मंदिर (प्राथमिक, माध्यमिक व ज्युनियर कॉलेज), इंदिरा नगर, नाशिक येथे सर्वे नंबर ८६७/२ मध्ये संरक्षक भिंत बांधकाम करणे. | १५.०० |
| २० | २ | नांदूरगाव गावठाण मांगीर बाबा मंदिरामागील रस्ता खडीकरण करणे. | १५.०० |
| २१ | १ | म्हसरूळ येथील वैदुवाडी येथे मंदिर परिसरात सुशोभीकरण करणे. | १५.०० |
| २२ | २५ | हेडगेवार नगर येथील परिसरात सी.सी.टी.व्ही. बसविणे. | १०.०० |
| २३ | २५ | दुर्गानगर, इंद्रनगर येथील परिसरात सी.सी.टी.व्ही. बसविणे. | १०.०० |
| २४ | २५ | कामटवाडे, त्रिमुर्ती चौक येथे सी.सी.टी.व्ही. बसविणे. | १०.०० |
| २५ | १६ | तोरणा सोसायटी येथे पुरातन महादेव मंदिरालगत असलेल्या मनपा ओपन स्पेसचे विद्युतीकरण करणे. | १०.०० |
| २६ | १० | बुद्धसागर उद्देशीय महामंडळ, अशोक नगर, सातपूर, नाशिक येथे मनपाच्या जागेत सभा मंडप बांधणे | १०.०० |
| २७ | १६ | ड्रीम सिटी समोरील मनपा उद्यानात गझिबो बसवणे | १०.०० |
| २८ | ५ | गजानन चौक परिसरातील सुलभ शौचालयाची दुरुस्ती करणे. | १०.०० |
| २९ | १९ | चेहेडी येथे मारूती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे व दिपमाळ बनविणे. | २०.०० |
| | | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **९६०.००** |